**प्रेसनोट दिनांक.२९/०७/२०१९**

**<u>कात्रज परिसरात घरफोडी चोरी करणारा अटकेत</u>**

**<u>भारती विद्यापिठ पोलिस ठाणेची कामगिरी</u>**

दि.१३/०६/२०१९ रोजी भारती विद्यापिठ पोलीस ठाणे हददीत घरफोडी गुन्हयांना प्रतिबंध व्हावा म्हणुन तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.महेंद्र पाटील त्यांचे कर्मचा-यासह पेट्रोलींग करीत असताना **उज्वल मोकाशी व शिवदत्त गायकवाड** यांना माहीती मिळाली की, एक इसम वाघजाई नगर सच्चाई माता मंदीर भागात येणार असुन त्याने व त्याचा एक अल्पवयीन साथीदार असे दोघांनी मिळुन कात्रज परिसरात घरफोडी चोरी केलेली आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याचे आम्हांस कळविले असता लागलीच आम्ही वरिष्ठांना कळविली असता त्यांनी खात्री करुन योग्य ती कारवाई करणेबाबत सुचना दिल्यानंतर बरोबर असलेले स्टाफच्या दोन टिम तयार करुन खाजगी वाहनाने रंगा चौकात जावुन सापळा रचुन वॉच केला असता सदर ठिकाणी बातमीतील वर्णनाचा इसमास पकडुन त्यांस आहे त्या स्थितीत ठेवुन त्यांस त्याचा नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव पत्ता १). अभिषेक सचिन खुटवड वय.१९ वर्ष रा.खंडोबा मंदीर जवळ अंजलीनगर कात्रज पुणे असे असल्याचे सांगितले नंतर त्यांचेकडे विचारणा केली असता तो उडवाडवीची उत्तरे देवु लागल्याने त्यांस पोलीस ठाणे येथे आणुन त्यांचेकडे अधिक चौकशी करता तपासादरम्यान त्याने त्याचे अल्पवयीन साथीदारासह सुमारे एक वर्षापासून कात्रज ,आंबेगाव परिसरात घरफोडी चो-या व इतरचोरी केल्या असल्याचे सांगितल्याने त्याचेकडून **एकुण कि.रू.३,१०,४००/- चे सोन्याचे दागिने व दोन मोबाईल हॅन्डसेट व एक मोटार सायकल** असा माल जप्त करण्यात आला आहे.

वरील आरोपीकडून भारती विद्यापिठ पोलिस स्टेशन कडील **एकुण ७ गुन्हे उघडकीस** आले आहेत.त्याचा अधिक तपास चालु असून सदरचा आरोपीचा साथीदाराचा शोध चालु असून अधिक तपास तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.महेंद्र पाटील हे करीत आहेत.

**सदरची कारवाई मा.श्रीकांत तरवडे साो.अप्पर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, मा.श्री बच्चन सिंह साो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे शहर, मा.प्रीती टिपरे मॅडम सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, विष्णू पवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विष्णू ताम्हाणे पोलीस निरीक्षक,(गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.महेंद्र पाटील , सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव,पोलीस हवालदार विनोद भंडलकर, गणेश सुतार, प्रणव सकपाळ,उज्वल मोकाशी,शिवदत्त गायकवाड, जगदीश खेडकर यांचे पथकाने केलेली आहे.**

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**भारती विदयापीठ पोलीस ठाणे पुणे**